दिशादर्शक, मार्गदर्शक!

दिवा न्यूज

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरुपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष–२ ■ अंक–२८ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १३ फेब्रुवारी २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

क्लस्टर योजनेवरून दिवा भाजप संभ्रमात!

सुरुवातीला क्लस्टर सर्वेक्षण निवडणुकांसाठी असल्याचा भाजप कडून आरोप,तर नंतर क्लस्टर परिषद आयोजित करून क्लस्टर कशी फायद्याची आहे याबाबतची मांडली भूमिका!

दिवा भाजपच्या कार्यक्रमाकडे ठाणे भाजपच्या प्रमुख नेत्यांनी फिरवली पाठ!

दिवा न्यूज विशेष /एस.के.

दिवा:–दिव्यासाठी क्लस्टर योजना जाहीर केल्यानंतर दिवा शहरातील विविध संघटना व राजकीय पक्ष यांच्या मधून प्रतिक्रिया यायला लागल्या. दिवा भाजपच्या वतीने सुरुवातीला दिव्यातील क्लस्टर योजना हा राजकीय स्टंट असल्याचं म्हटलं गेलं. निवडणुकीच्या तोंडावर क्लस्टर योजना जाहीर करून राजकीय फायदा घेण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव असल्याचं म्हटलं गेलं. दिवा मनसेनेही याच पद्धतीने क्लस्टर वर हल्ला चढवला होता. पण आता दुसरीकडे मागील आठवड्यात भारतीय जनता पार्टीच्या वतीने दिव्यात क्लस्टर परिषदेचे आयोजन करून क्लस्टर कशी फायद्याची आहे, याचा पाढा वाचण्यात आला.

दिवा भाजपची नेमकी भूमिका काय? असा प्रश्न यामुळे निर्माण होत आहे. पार्टी लाईन म्हणून एक विचार एका भागात एका पक्षाकडून असणे अपेक्षित असतं.मात्र दिवा शहरांमध्ये भारतीय जनता पार्टी गोंधळलेल्या परिस्थितीत असलेली पाहायला मिळते. एकीकडे क्लस्टर हा निवडणुकीचा जुगाड आहे असं म्हणायचं, आणि दुसरीकडे त्याच क्लस्टर वर परिषद आयोजित करून ही योजना कशी फायद्याची आहे याचं गुणगान गायचं.यातून नेमका काय मेसेज भारतीय जनता पार्टीला द्यायचा आहे

हे कळायला मार्ग नाही. या परिषदेकडे भाजपच्या ठाणे नेतृत्वाने पाठ फिरवली. परिषदेला मार्गदर्शन करणाऱ्यांचा भारतीय जनता पार्टीशी तसा संबंध नाही. उलट पक्षी भारतीय जनता पार्टीचे विरोधक असणारेच या परिषदेला मार्गदर्शन करायला आले होते. असे असताना भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा नेतृत्वाने या परिषदेकडे पाठ फिरवणं हे स्वाभाविकच होत. एकीकडे ठाणे महानगरपालिका आणि बाळासाहेबांची शिवसेना हे दिव्यासाठी क्लस्टर कशी फायद्याची आहे याबाबत पहिल्या दिवसापासून जनजागृती करत आहेत.

(पान २ वर)

ठाण्यात रस्त्यावर खड्डा पडल्यास प्रत्येक खड्ड्यामागे एक लाखाचा दंड

ठाणे खड्डेमुक्त करण्यात दिरंगाई नको!

३१ मे पूर्वी पूर्ण करा

ठाणे: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतील 'खड्डेमुक्त ठाणे' साकारण्यासाठी ठाणे महापालिकेने चांगली कंबर कसली आहे. राज्य सरकारने दिलेल्या ३९१ कोटी रुपयांमधून होत असलेली १५६ कामे आणि इतर रस्ते यांच्या कामांबाबत मार्गदर्शन करण्यासाठी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी बैठक घेतली.

दरम्यान ३१ मे पूर्वी ही कामे पूर्ण न झाल्यास कंत्राटदारावर सक्त कारवाई करण्यात येईल. तसेच, दोष निवारण कालावधी (डिफेक्ट लायबिलिटी पिरियड) मध्ये रस्त्यावर खड्डा पडल्यास प्रत्येक खड्ड्यामागे (एक चौरस मीटर) एक लाख रुपयांचा दंड आकारला जाईल, अशा इशारा कंत्राटदारांना देण्यात आला. वेळेत काम पूर्ण झाल्यास देयके अदा करण्यासाठी सात दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागणार नाही, याची हमीही महापालिका प्रशासनाने कंत्राटदारांना दिली आहे. कामाची अमलबजावणी तसेच, देयके याबाबत काही अडचणी आल्यास थेट आयुक्तांशी संपर्क साधावा, असेही स्पष्ट करण्यात आले.

'खड्डेमुक्त ठाणे' हे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी आतापासून कार्यकारी अभियंत्यांनी कामाला लागावे. पावसाळयात कोणत्या अडचणी येतात, त्यावर तोडगा काय आहे, हे आताच पाहून त्यांची कामे पूर्ण करावीत. रस्त्यांच्या कामात एक दिवसाचीही दिरंगाई नको, अशा स्पष्ट सूचना आयुक्त बांगर यांनी दिल्या. या बैठकीस, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपनगर अभियंता रामदास शिंदे, आय आय टी मधील प्राध्यापक के. व्ही. कृष्णराव, सर्व कार्यकारी अभियंते आणि कंत्राटदारांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले अधिकारी आणि कंत्राटदार यांच्या आढावा बैठकीत निर्देश

आयआयटीमधील तज्ज्ञांनी केले दर्जा आणि गुणवत्ता राखण्याबाबत मार्गदर्शन

' खड्डेमुक्त ठाणे ' या अभियानात शहरातील ८.५ कि.मी रस्त्यांचे सिमेंट कॉँक्रिटीकरण, २६.६९ कि.मी रस्त्याचे यू.टी.डब्ल्यू.टी पध्दतीचे काम, व ४७.५१ कि.मी रस्त्यांचे डांबरीकरण पध्दतीने पुर्नपृष्ठीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य सरकारने ३९१ कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यात एकूण ८२.७३ किमी रस्त्यांची १५६ कामे केली जाणार आहेत. हा निधी लगेच उपलब्ध व्हावा यासाठी सरकारकडे पाठपुरावा सुरू आहे. राज्य सरकारने रस्त्यांसाठी ठाणे महापालिकेस एकूण ६०५ कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यात, २२४ कोटी रुपयांच्या आणखी १२७ रस्त्यांच्या कामांचाही समावेश आहे.

कंत्राटदारांनी त्यांना मिळालेल्या सर्व रस्त्यांची कामे एकाच वेळी आणि त्वरित सुरू करावीत. तेवढ्या मनुष्यबळाची व्यवस्था आधीच करावी. कंत्राटदारांनी लक्ष्य निर्धारित करून त्याप्रमाणे उलट्या गणतीने काम सुरू करावे, तसेच, या कामांसाठी वाहतूक पोलिसांची परवानगीही कार्यकारी अभियंत्यांनी आधीच घेवून ठेवावी, अशा सूचना आयुक्त बांगर यांनी दिल्या.

कंत्राटदार आणि अभियंते यांच्या मनातील तांत्रिक शंकांचे निरसन करण्यासाठी आजची बैठक झाली. या सत्राचा अभियंते आणि कंत्राटदार यांना फायदा होईल. याशिवाय, प्रत्यक्ष काम करताना काही समस्या आल्यास नगर अभियंता यांच्या मार्फत आयआयटीच्या तज्ज्ञांशी संपर्क साधावा. रस्त्यांची कामे सुरू झाली की आयआयटीच्या टीमच्या साईटवर भेटी सुरू होतील. त्याशिवाय, कार्यकारी अभियंत्यांनी त्यांच्या प्रभाग समिती अंतर्गत येणाऱ्या रस्त्यांच्या कामांना दररोज भेट देऊन कामाचा आढावा घ्यावा. दर एखाद्या ठिकाणी कमी दर्जाचे काम होत असेल तर अभियंत्यांनी कंत्राटदारावर कारवाईचा प्रस्ताव द्यावा. या कर्तव्यात दिरंगाई केली तर कार्यकारी अभियंत्यांवरही कारवाई केली जाईल, असा इशारा आयुक्त बांगर यांनी दिला.

ठाणे शहरातील रस्त्यांच्या कामाचे त्रयस्थ संस्थेमार्फत ऑडिट केले जाणार आहे. त्यासाठी आयआयटीमधील प्रा. के. व्ही. कृष्णराव आणि त्यांची टीम काम पाहणार आहे. कामात काही त्रुटी असल्यास ही टीम त्या दुरुस्त करण्यासाठी मार्गदर्शनही करणार आहे. या बैठकीत, कृष्णराव यांनी त्यांच्या गुणवत्तेबद्दल असलेल्या अपेक्षा विस्ताराने सांगितल्या. कोणत्या कामासाठी कोणती पद्धत, त्यासाठी लागणारे साहित्य, त्याचा दर्जा याबद्दल त्यांनी माहिती दिली.

(पान २ वर)

अदानी समूहाच्या देशविदेशात शेकडो बोगस कंपन्या नसीम खान यांचा आरोप

अदानी उद्योग समुहाची चौकशी करा..!
ठाणे शहर (जि.) काँग्रेस कमिटी
अदानी ला संरक्षण देणा-या मोदी सरकार चा जाहीर निषेध..!
चौकीदार चोर है।
PM's Friends Scam
LIC/ स्टेट बँकेच्या गुंतवणूकदारांना संरक्षण दया..!
अदानी उद्योग समुहाच्या आर्थिक गैरव्यवहाराची
अदानी हाय... हाय... मोदी सरकार हाय... हाय...
Taxpayers'
समूहातील आर्थिक गैरकारभाराचा पर्दाफाश करणाऱ्या हिडनबर्ग संस्थेच्या अहवालाची चौकशी करा
विक्रांत चव्हा
अध्यक्ष,ठाणे काँग्रेस

ठाण्यात काँग्रेसचे केंद्रीय सरकारविरोधात निदर्शने

ठाणे: अदाणी समूहाच्या देशविदेशात शेकडो बोगस कंपन्या असून अब्जावधी रूपयाचा भ्रष्टाचार समोर येत असून एल.आयू.सी., स्टेट बँक, एअरपोर्ट,रेल्वे अशा ठिकाणची गुंतवणूक धोक्यात आणली असतानाही केंद्रातील भारतीय जनता पार्टी सरकारने अदाणी यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री नसीम खान यांनी सोमवारी ठाण्यात केला.

अदाणी समूहाच्या भ्रष्टाचाराला पाठीशी घालणाऱ्या केंद्रातील भा.ज.पा.सरकार विरोधात अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने देशभरात निदर्शने करण्यात आली होती. राज्यातील विविध नेते या आंदोलनात सहभागी झाले होते.

ठाण्यातील एल.आय् .सी. कार्यालयाच्या मुख्यालयासमोर सोमवारी ठाणे काँग्रेसच्या वतीने निदर्शने करण्यात आली होती. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री नसीम खान यांच्यासमवेत ठाणे काँग्रेस अध्यक्ष ॲड.विक्रांत चव्हाण,प्रदेश काँग्रेस सचिव मनोज शिंदे, शहर मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे आदि मान्यवर व शेकडो पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना नसीम खान यांनी या देशभरातील सर्व सामान्य जनतेचा पैसा हा विश्वासार्ह ठिकाणी गुंतवणूक होतो एल.आय.सी. किंवा स्टेट बँक ह्यानी सर्वसामान्य जनतेचा विश्वास कमावला होता म्हणूनच गरीब सर्वसामान्य जनता आपल्या मेहनतीची पूंजी अशा ठिकाणी गुंतवत असते. या संस्थेची गुंतवणूक केंद्रातील सरकारच्या दबावामुळेच अदाणी समूहात करण्यात आली,आता अदाणी समूहाचा आर्थिक गैरव्यवहाराचा पर्दाफाश करणाऱ्या हिडनबर्ग संसदेच्या अहवालाची संयुक्त संसदिय समिती मार्फत चौकशी झाली पाहिजे अथवा सर्वोच्च न्यायालया मुख्य न्यायाधीशांच्या देखरेखीखाली चौकशी करावी अशी मागणी नसीम खान यांनी शेवटी बोलताना केली अन्यथा या विरोधात आता काँग्रेस जनआंदोलन उभारणार असल्याचे त्यांनी या प्रसंगी सांगितले.

ठाण्यात धावत्या कारला आग पाच जण बचावले



ठाणे: कराडहून ठाणे घोडबंदर रोड मार्गे मीरा रोडला जाताना अचानक कारला गुरुवारी मध्यरात्री पावणेदोन वाजण्याच्या सुमारास आग लागली. यावेळी गाडी पाच होते. ते बचावले असून गाडीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. मीरा रोड येथील कारमालक आणि चालक अनिल लोकरे हे विजय लोकरे (४५), दिलीप बामणे (६५),कुसुम बामणे (५५) आणि लता हिंदुराव कारंडे (५२) यांना घेऊन कराड वरून मिरारोडला निघाले होते. ते ठाण्यातील घोडबंदर रोड ने जाताना, गायमुख जकात नाक्या जवळ येतात गाडीने पेट घेतला. याचदरम्यान गाडीतील पाच जणांनी गाडीतून बाहेर पडत आगीची माहिती अग्निशमन दलाला दिली. घटनास्थळी वाहतूक पोलीस व अग्निशमन दलाचे जवानांनी धाव घेत, आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. तेंव्हा कुठे आग साडेतीन वाजण्याच्या सुमारास पूर्णपणे नियंत्रणात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

संपादक
सुहास खंडागळे
व्यवस्थापक
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
छायाचित्रकार/प्रतिनिधी
सुदेश सकपाळ
वितरण प्रतिनिधी
संतोष मदने
ऑफिस पत्ता :-
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

ठाण्यात रस्त्यावर खड्डा पडल्यास प्रत्येक खड्ड्यामागे एक लाखांचा दंड

(पान १ वरून)

तसेच, डांबरीकरण, मास्टिक, सिमेंट काँक्रिटीकरण आणि यू.टी.डब्ल्यू.टी प्रकारचे काम यांच्या प्रचलित कामाच्या पद्धती जाणून घेतल्या. त्यात काही बदलही सुचवले. रस्त्याचे प्रत्यक्ष काम सुरू होण्यापूर्वी, सगळे आराखडे, साधनसामुग्रीचे प्रमाण यांची माहिती तज्ज्ञांनी तपासून दिल्यावरच काम सुरू करावे, असे कृष्णराव यांनी स्पष्ट केले.

रस्त्यावर काम करताना तो स्वच्छ करून घेणे, रस्ता पूर्ण झाल्यावर खडीचा वापर टाळणे, डांबर आणि सिमेंट काँक्रिट यांचे तापमान योग्य राखणे यावर लक्ष दिल्यास रस्ते दर्जेदार होतील, असे कृष्णराव म्हणाले. तसेच, रस्त्यावर भेगा पडल्याच्या तक्रारी कमी करण्यासाठी त्यांनी तांत्रिक उपायही सुचवला. एक्सपांशन जॉईंटचा वापर आता बंद झाला आहे. त्यामुळे ठाण्यातही ती पद्धत वापरली जावू नये, असे कृष्णराव यांनी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतील बदलत्या ठाण्यात स्वच्छ व सुंदर ठाण्याबरोबरच, खड्डेमुक्त ठाणे हे मुख्य अभियान आहे. स्वच्छ व सुंदर ठाणे अंतर्गत शहरातील सर्व रस्ते, सार्वजनिक जागा, पर्यटन स्थळे कायमस्वरुपी स्वच्छ ठेवणे, नेहमी कचरा पडणाऱ्या शहरातील सर्व जागा कचरामुक्त करुन त्या सर्व ठिकाणी सौंदर्यीकरण करणे, डेब्रिजमुक्त ठाणे शहर, शहरातील रस्ते, उड्डाणपूल यांची यांत्रिकी पध्दतीने साफसफाई करणे यांचाही समावेश आहे.

त्याचबरोबर, ठाणे शहर सौंदर्यीकरणाअंतर्गत शहरातील प्रवेशद्वार, शिल्पाकृतीसह चौक सुशोभीकरण, रस्ते सुशोभीकरण, भित्तीचित्रे, डिव्हायडर व कर्ब स्टोनची रंगरंगोटी, थर्मोप्लस्टिक पेंटद्वारे लेन मार्किंग व झेब्रा क्रॉसिंग, उड्डाणपुल, पादचारी पूल, खाडीवरील पूल, सरकारी इमारतींची रंगरंगोटी व विद्युत रोषणाई, मियावाकी तंत्रज्ञानाचा वापर करुन वृक्ष लागवड करणे याबद्दलही शहरात कार्यवाही सुरू आहे.

क्लस्टर योजनेवरून दिवा भाजप संभ्रमात!

(पान १ वरून)

मग तो निवडणुकीचा मुद्दा आहे असे मानले तरी सुद्धा बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे स्थानिक नेते हे क्लस्टर बाबत ठोस भूमिका घेऊन जनतेमध्ये जाताना दिसतात. याउलट दिवा शहरातील प्रमुख विरोधी पक्ष असणारा भारतीय जनता पार्टी यांच्या भूमिकेत मात्र संभ्रम असलेला पाहायला मिळतो.क्लस्टर योजना जाहीर झाल्यानंतर दिव्यात क्लस्टर झाली पाहिजे, अशी भूमिका घेत निवडणुकीच्या तोंडावर सर्वेक्षणाच्या माध्यमातून लोकांची फसवणूक नको अशी भूमिका दिवा भाजपने घेतली तर काही दिवसात त्या उलट भूमिका क्लस्टर परिषदेच्या माध्यमातून दिवा भाजपने घेत क्लस्टर कसं फायद्याचा आहे याची माहिती पक्षा व्यतिरिक्त अन्य लोकांना बोलून जनतेला दिली. पक्ष म्हणून एक भूमिका या ठिकाणी भाजपकडून घेताना दिसत नाही. यातून भारतीय जनता पार्टीतच क्लस्टरच्या मुद्द्यावर ताळमेळ नसल्याचे स्पष्ट होते.सक्षम विरोधी पक्ष म्हणून भाजप क्लस्टरच्या मुद्द्यावर गोंधळली आहे का? हा प्रश्न या निमित्ताने निर्माण होतो.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिवा न्यूज वर्तमानपत्र आयोजित पहिल्या बहुचर्चित चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ संपन्न

दिवा पोलीस चौकीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहाजी शेळके यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण

दिवा(प्रतिनिधी):– दिवा न्यूज वर्तमानपत्राने आयोजित केलेल्या दिवा शहर मर्यादित चित्रकला स्पर्धेला दिवा शहरातील विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला. या चित्रकला स्पर्धेत दिवा शहरातील विविध शाळांमधील सुमारे १००० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत रविवारी पार पडला. पहिली ते चौथी व पाचवी ते नववी या दोन गटात आयोजित केलेल्या या स्पर्धेतील विजेत्यांचे व उत्तेजनार्थ बक्षीस मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांनी कौतुक केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दिवा पोलीस चौकीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहाजी शेळके व परीक्षक म्हणून संजय बेर्डे सर व संतोष खरात सर उपस्थित होते.यावेळी विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

दिवा न्यूज वर्तमानपत्र आयोजित पहिल्या बहुचर्चित चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ संपन्न

पहिली ते चौथी गटात पलक सिंगचा प्रथम तर पाचवी ते नववी गटात जानवी विजय सांगळे प्रथम

दिवा(प्रतिनिधी):– दिवा न्यूज वर्तमानपत्राने आयोजित केलेल्या दिवा शहर मर्यादित चित्रकला स्पर्धेला दिवा शहरातील विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला. या चित्रकला स्पर्धेत दिवा शहरातील विविध शाळांमधील सुमारे १००० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत रविवारी पार पडला. पहिली ते चौथी व पाचवी ते नववी या दोन गटात आयोजित केलेल्या या स्पर्धेतील विजेत्यांचे व उत्तेजनार्थ बक्षीस मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांनी कौतुक केले. यावेळी विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

दिवा न्यूज चित्रकला स्पर्धेसाठी **संजय बेर्डे सर** (देवनागरी हस्ताक्षर क्लासेस, ठाणे), **संतोष खरात सर** (माय हॉबी ड्रॉइंग ॲण्ड संस्कार भारती रांगोळी क्लासेस ठाणे) यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

स्पर्धेतील विजेते विद्यार्थी:–

पहिला क्रमांक –
पलक सिंग
दुसरा क्रमांक (विभागून)
स्मित सोनवणे
–ग्लोबल इंग्लिश स्कूल
नितेश पोयेकर
–सेंट मेरी स्कूल
तिसरा क्रमांक
अंशू पाल

उत्तेजनार्थ

रितिका कौर
–सेंट मेरी स्कूल
अभिजीत महाराणा
–ग्लोबल इंग्लिश स्कूल
विघ्नेश विनोद आहेर
– सेंट मेरी स्कूल
मनस्वी मंगेश शिगवण
–सेंट मेरी स्कूल
गाथा आतिश मुळे
– ग्लोबल इंग्लिश स्कूल
पार्थ प्रवीण वारघडे
–ग्लोबल इंग्लिश स्कूल
प्राची कुमार
– ग्लोबल इंग्लिश स्कूल
प्रियांशू गुप्ता
–एस एम जी स्कूल
प्रितेश गुप्ता
–साउथ इंडियन इंग्लिश स्कूल
सार्थक गोळे
–ग्लोबल इंग्लिश स्कूल

पाचवी ते नववी
गट ब

पहिला क्रमांक
जान्हवी सांगळे
–सेंट मेरी स्कूल
दुसरा क्रमांक
विनोद जयस्वाल
–साउथ इंडियन इंग्लिश स्कूल
तिसरा क्रमांक
सुरज शर्मा –सेंट मेरी स्कूल

उत्तेजनार्थ

आर्यन दत्तात्रय शिंदे
–सेंट मेरी स्कूल
प्राची हरिश्चंद्र मोगरे
– गणपत वारेकर स्कूल
रुद्र राकेश काजरे
–ग्लोबल इंग्लिश स्कूल
गिरीजा देसाई
–ग्लोबल इंग्लिश स्कूल
वेदांत अनंत पडेलकर
–गणपत वारेकर विद्यालय
वेदांत दिगंबर मोरे
–ग्लोबल इंग्लिश स्कूल
साहिल घोष
– सेंट मेरी स्कूल
श्रेया मनोज बागकर
–सेंट मेरी स्कूल
प्रांजल संजय जाधव
– सेंट मेरी स्कूल
आर्या अंकुश धोपट
– सेंट मेरी स्कूल

ठामपाला कोविशिल्ड पाठोपाठ कोवॅक्सिन लस उपलब्ध

ठाणे : राज्यशासनाकडून ठाणे महानगरपालिकेस कोवॅक्सिन लसीचा साठा उपलब्ध झाला असून महापालिकेच्या नऊ आरोग्यकेंद्रात आजपासून (बुधवार ०८ फेब्रुवारी)कोवॅक्सिन लसीकरण सुरू होणार आहे. ज्या लाभार्थ्यांनी अद्यापपर्यत लसीकरण करुन घेतले नाही त्यांनी या लसीकरणाचा लाभ घ्यावा असे आवाहन ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी केले आहे.

कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, पार्किंग प्लाझा, किसन नगर आरोग्य केंद्र, मानपाडा आरोग्य केंद्र, शिळ आरोग्य केंद्र, सी आर, वाडिया आरोग्य केंद्र, लोकमान्य कोरस आरोग्य केंद्र, रोझा गार्डनिया आरोग्य केंद्र, ठाणे महापालिका कौसा रुग्णालय या ठिकाणी कोवॅक्सिन लसीकरण सुरू केले जाणार आहे. तसेच १५ ते १८ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना पहिला व दुसरा डोस तसेच १८ वर्षावरील ज्या नागरिकांचा कोवॅक्सिन लसीचा पहिला, दुसरा व बुस्टर डोस दिला जाणार असून ज्यांचे लसीकरण झालेले नाही तसेच ज्यांनी अद्याप लसीचा एकही डोस घेतलेला नाही त्यांनी लसीकरण करुन घ्यावे.

भारतात जरी कोरोना आटोक्यात असला तरी तो अजून संपलेला नाही. भारताव्यतिरिक्त इतर देशांमध्ये कोरोनाचे रुग्ण मोठ्याप्रमाणावर आढळून येत आहेत. तरी खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांनी लसीकरण करुन घ्यावे असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

ठाण्यात सर्वत्र लावण्यात आलेल्या अनधिकृत बॅनरवर कारवाई करा, अन्यथा प्रशासनाला अंधत्व आल्याचे जाहीर करा – संजय घाडीगावकर

ठाणे : ठाणे शहरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसाचे अभीष्टचिंतन करणारे बॅनर जागोजागी लावण्यात आलेले आहेत. त्यावर ठाणे महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक यांनी तत्काळ कारवाई करावी अन्यथा प्रशासनाला राजकीय दबावाखाली अंधत्व आल्याचे जाहीर करावे अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांनी आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे केली आहे.

उपजिल्हाप्रमुख घाडीगावकर यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात, एका शिपायाने दाखल्यासाठी ५०० रुपयांची लाच मागितली म्हणून आपण त्याला तात्काळ घरी बसविले परंतु ठाणे महापालिका हद्दीत दिनांक १ फेब्रुवारी पासून मुख्यमंत्री शिंदे आणि त्यांच्या परिवारातील सदस्यांचे वाढदिवसाच्या अभीष्टचिंतनाचे बॅनर लावून अंदाजे १००-१५० कोटीच्या सुशोभीकरणाच्या खर्चावर शहराचे विद्रुपीकरण झालेले आहे. पण आपण ज्या रस्त्याने मुख्यालयात येता तरी शहराचे विद्रुपीकरण आपणास दिसत नाही? आपण अंधत्व झाले सारखे का वागत आहात? तसेच मुख्यालयातील महापौर कार्यालय, राजकीय पक्ष कार्यालय, महापौर निवास पुन्हा उघडून बसणारे माजी महापौर आणि राजकीय पदाधिकारी यांचेवर गुन्हे का दाखल करीत नाहित? त्यांच्या कडून ९ मार्च २०२२ पासून आजपर्यंत दालनावर झालेला खर्च का वसूल केलेला नाही? येथील कर्मचारी आजही त्यांचे राजकीय कामे का करीत आहेत? ह्या कर्मचारी वर्गास बक्षिसी म्हणून २-२ शासकीय निवासस्थाने आणि पात्रता नसताना ही प्रभारी कार्यभार म्हणून देण्यात आलेले आहेत का? आपण अंध नसाल तर जनसंपर्क विभाग, अतिक्रमण विभाग आणि महापालिका सचिव विभाग मधील सबंधित अधिकारी यांच्या त्यांनी जाणीवपूर्वक केलेल्या स्वत:च्या शासकीय कर्तव्यात कसूरी करीता आपण शिपायावर केलेल्या कारवाईप्रमाणेच या सर्व सबंधित विरोधात निलंबनाची कारवाई का करीत नाही ?

जर आपण सत्ताधारी यांचे बाहुले नसाल तर ठाणे महापालिका आयुक्त तथा प्रशासक म्हणून आपली पारदर्शी भूमिका कडक कारवाई आणि कार्यवाही करावी अन्यथा आपण जाहिर करावे की आपणास राजकीय दबावाने अंधत्व आलेले असून सताधारी पक्षाचे मुख्यमंत्री असल्याने आपण आणि ठाणे महापालिका प्रशासन अपंग झालेले आहात का? अशी मागणी त्यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात केली आहे.

गृहनिर्माण संस्थांवरील अकृषिक कराची तलवार दूर

आ. संजय केळकर यांच्या पाठपुराव्यामुळे महसुल मंत्र्यांकडून स्थगिती

ठाणे: अकृषिक (एन ए) कराच्या नोटीसांनी हैराण झालेल्या गृहनिर्माण संस्थांची चिंता अखेर दूर झाली आहे. आमदार संजय केळकर यांच्या सततच्या पाठपुराव्यानंतर बुधवारी यासंदर्भात पार पडलेल्या बैठकीत राज्याचे महसुलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अकृषिक कर आकारणीला स्थगिती दिली आहे.

ठाणे शहरात पूर्वी शेतीचा व्यवसाय असल्याने प्रत्येकाकडे सातबारा असे, पण आता वाढत्या नागरीकरणामुळे या जागी इमारती उभ्या राहिल्या. गेल्या अनेक वर्षांपासून या भागांत रहिवाशांना अकृषिक कर भरण्याच्या नोटीसा देण्यात येत होत्या. मात्र, हा जिझिया कर कोणीही भरत नसल्याने थकबाकीचा डोंगर वाढत होता. अगदी २०० ते ३०० फुटांची घरे आणि दुकानांनाही लाखोंच्या एनए नोटीसा पाठवण्यात आल्याने नागरीक हैराण झाले होते.

याबाबत अनेक रहिवाशांनी आमदार संजय केळकर यांच्याकडे धाव घेत यातून सुटका करण्याची मागणी केली होती. केळकर यांनी याबाबत महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी बोलून या नोटीसा अन्यायकारक असल्याचे निदर्शनास आणून दिले.

२०१७ साली या नोटिसांना स्थगिती देण्यात आली होती, मात्र कालांतराने पुन्हा अकृषिक कराच्या थकबाकीची टांगती तलवार गृहनिर्माण संस्थांवर लटकत होती. त्यामुळे नागरीक हवालदिल झाले होते. दरम्यान, शहरी भागातील गृहनिर्माण संस्थांना लागू केलेली अकृषिक (एन ए) कर आकारणी रद्द करण्यासाठी बुधवारी राज्याचे महसुलमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहावर आयोजित केलेल्या विशेष बैठकीत एन ए कर आकारणीला स्थगिती देऊन मंत्री महोदयांनी यावर तोडगा काढला. महसूलमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला भाजपचे मुंबई प्रदेश अध्यक्ष आमदार आशिष शेलार, आमदार संजय केळकर, आमदार अतुल भातखळकर,आमदार गीता जैन, आमदार भारती लव्हेकर, आमदार योगेश सागर, आमदार पराग अळवणी, आमदार गणपत गायकवाड, अतिरिक्त मुख्य सचिव नितीन करीर आणि महसूल विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते.

नियोजन समितीच्या बैठकीस गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

ठाणे : क्लार्क आणि कनिष्ठ अधिकाऱ्यांना नियोजन समितीच्या बैठकीला पाठवून अधिकारी सुट्टीवर गेल्याची गंभीर बाब नुकतीच पार पडलेल्या नियोजन समितीच्या बैठकीत पुढे आली. याबाबत पालकमंत्र्यांनी संताप व्यक्त करत,अशा अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी, असे आदेश पालकमंत्री तथा राज्य शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. तसेच तरीसुध्दा त्यांनी योग्य उत्तर दिले नाही तर त्यांना माझ्या दालनात घेऊन यावे असेच निर्देशही यावेळी त्यांनी दिले.

नुकतीच नियोजन भवन येथे जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली. यावेळी पालकमंत्र्यांकडून आढावा घेतला जात होता, त्यानुसार काही कामांच्या बाबतीत अनेक अधिकाऱ्यांना योग्य उत्तरे देता आली नाही, निधी देऊनही कामांना स्थगिती कशी दिली जाते, कोणी स्थगिती दिली यावरुन जिल्हा क्रिडा विभागाला देसाई यांनी चांगलेच धारेवर धरले. मात्र त्यांच्या प्रश्नांची देखील योग्य उत्तरे क्रिडा अधिकाऱ्यांना योग्य पध्दतीने देता आली नाही. तंत्र शिक्षण विभागाच्या बाबतीत चर्चा सुरु असतांना या विभागाचे प्रमुख अधिकारी हे सुट्टीवर गेल्याचे त्यांच्या निर्दर्शनास आले. बैठकीला या विभागाचे क्लार्क हजर राहिल्याने देसाई यांनी चांगलाच संताप व्यक्त केला. त्यातही कामांची योग्य माहिती न मिळाल्याने पालकमंत्र्यांनी संताप व्यक्त केला. त्यातही मंजुर निधीतील कोटय़ावधींचा निधी पडून असल्याचेही त्यांच्या निर्दशनास आले. त्यावरुन देखील त्यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली.

त्यातही ग्रामीण भागातील सोनावळे येथील आरोग्य केंद्राच्या कामाच्या स्थितीचा आढावा घेत असतांना अधिकाऱ्यांनी चुकीची आणि दिशाभुल करणारी माहिती दिली. त्यातही येथील काम आता कुठे सुरु झाले असतांना ते दोन महिन्यात पूर्ण करण्याचा दावा संबधींत अधिकाऱ्याने केल्याने देखील उपस्थित आमदारांनी त्यांच्या या उत्तराची पोलखोल केली. त्यातही अधिकारी कामात गती देत नसल्याने विकास कामे रखडली असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे कामांना उशीर झाला तर संबधींत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

कोकण ग्रामीण वार्ता

प्रतिनिधी / एम. एम. काझी

जिल्ह्यातील शाळांसह रुग्णालयांचे ऑपरेशन थिएटर अत्याधुनिक पध्दतीने करावे-पालकमंत्री शंभूराज देसाई

ठाणे: जिल्ह्यातील शाळा मॉडेल स्कूल कराच त्याचबरोबर आरोग्य विभागाच्या ग्रामीण रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर उभारण्याच्या कामांना प्राधान्य द्या असे निर्देश ठाण्याचे पालकमंत्री तथा राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले. त्यांनी ठाणे जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध यंत्रणांना देण्यात येणाऱ्या निधीच्या खर्चाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलताना वरील निर्देश दिले आहे.

जिल्हाधिकारी ठाणे, नियोजन भवन
जिल्हा नियोजन समिती, ठाणे
आढावा बैठक
मा.ना.श्री. शंभूराज देसाई
शुल्क महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली
नियोजन भवन, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे.
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील ठाणे जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडलेल्या आढावा बैठकीत आमदार किसन कथोरे, आमदार शांताराम मोरे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये, उपजिल्हाधिकारी गोपीनाथ ठोंबरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक मनिषा शिसोदे, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील जाधव आदी यावेळी उपस्थित होते.

जिल्ह्यात आतापर्यंत झालेल्या खर्चाचा आढावा घेऊन देसाई म्हणाले की, जिल्हा वार्षिक योजना, अनुसूचित उपयोजना व विशेष घटक योजनेतून आतापर्यंत झालेल्या कामांचा व निधी खर्चाचा आढावा घेतला. उपलब्ध नियतव्यातून ६५ टक्के खर्च झाला आहे. मार्च अखेरपर्यंत १०० टक्के खर्च करण्याचे उद्दिष्ट आहे. राज्य शासनाने दिलेला सर्व निधी जिल्ह्यातील यंत्रणांना वितरित करण्यात आला आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने या वर्षीचा निधी खर्च करून पुढील वर्षी आणखी निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.

जिल्हा वार्षिक योजनेतून ठाणे जिल्ह्यासाठी अतिरिक्त निधी मिळावा, यासाठी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांच्याकडे राज्यस्तरीय बैठकीत मागणी केली आहे. २०२३-२४ या वर्षासाठी ठाणे जिल्ह्यासाठी ८५० कोटींच्या निधीची मागणी केली आहे. यावर्षी ही रक्कम ६१८ कोटी रुपये मिळाले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही या जिल्ह्यासाठी आणखी विशेष वाढीव निधीसाठी प्रयत्न करणार असल्याचेही देसाई यांनी यावेळी सांगितले.

जिल्ह्यात सहा ग्रामीण रुग्णालये आहेत. त्या रुग्णालयांमध्ये जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून अत्याधुनिक मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर उभारण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सचिवालय कक्षात शासनस्तरावरील अर्ज, निवेदनांवर तातडीने कार्यवाही

– जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

ठाणे: सर्वसामान्य जनतेचे दैनंदिन प्रश्न, शासन स्तरावर असलेली कामे व त्या संदर्भात प्राप्त होणारे अर्ज, निवेदने इत्यादीवर कार्यवाही करण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सचिवालय कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. कक्षात आलेल्या लेखी अर्ज, निवेदनावर कार्यवाही करून तसा अहवाल मुख्यमंत्री कार्यालयास देण्यात येतो. त्यामुळे जिल्ह्यातील जनतेने शासनस्तरावरील आपले अर्ज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सचिवालय कक्षाकडे द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

स्थानिक पातळीवर नागरिकांच्या अर्जांवर तत्पर कार्यवाही होण्याच्या उद्देशाने जिल्हास्तरावर ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सचिवालय कक्ष सुरू करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तळमजल्यावरील या कक्षाचे काम सुरू झाले आहे. या कक्षात मुख्यमंत्री महोदयांना उद्देशून असलेले अर्ज, निवेदन, तक्रार स्वीकारण्यात येतील. हे अर्ज, निवेदने संबंधित विभागांना पाठविण्यात येतील. त्या विभागाने त्यावरील कार्यवाही केल्यानंतर त्याचा अहवाल अहवाल नियमितपणे मुख्यमंत्री सचिवालयास पाठविण्यात येणार आहे. या सुविधेमुळे ठाणे जिल्ह्यातील नागरिकांना थेट मंत्रालयात जाण्याचे कष्ट वाचणार आहेत. स्थानिक पातळीवरच समस्या सोडविण्यास यामुळे मदत होणार असून अर्जदारांचा वेळ वाचणार आहे, असेही जिल्हाधिकारी शिनगारे यांनी यावेळी सांगितले.

या कक्षाचे पदसिद्ध विशेष कार्यअधिकारी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी हे काम पाहत आहेत. तसेच या कक्षासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

जातगणनेसाठी ठाणे जिल्ह्यातून २ हजार ओबीसींची राज्य सरकारला ४५ संस्था, संघटनांकडूनही निवेदने

ठाणे : बिहारच्या धर्तीवर महाराष्ट्रातही ओबीसींची जातगणना करण्यात यावी, या मागणीसाठी ठाणे जिल्हाधिकार्यांच्या मार्फत सुमारे २ हजार ओबीसी नागरिकांनी राज्य सरकारला पत्रे धाडली आहेत. विशेष म्हणजे, ४५ ज्ञाती संघटनांकडूनही निवेदने पाठविण्यात आली असून लवकरात लवकर ही जनगणना सुरु केली नाही. तर, ठाणे ओबीसी एकीकरण समितीच्या माध्यमातून राज्यभर ओबीसींमध्ये जनजागृती करुन रस्त्यावरची लढाई लढण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

नुकतीच बिहार राज्यात जातनिहाय जनगणना सुरु झाली आहे. शिवाय सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देउन बिहार राज्याच्या जनगणनेस हिरवा कंदिल दिला आहे. याच धर्तीवर महाराष्ट्रातही जातनिहाय जनगणना करावी, अशी मागणी ओबीसी समाजामधून होत आहे. या मागणीसाठी ठाणे ओबीसी एकीकरण समितीच्या माध्यमातून विविध जातीनिहाय संघटना, सामाजिक संघटनांनी ओबीसी जनजागृती अभियानास सुरुवात केली आहे. या अभियानामुळेच ठाणे जिल्ह्यातून सुमारे २ हजार नागरिकांनी आणि आंबेडकरी, चर्मकार, कुणबी, माळी, साळी, कोळी, तेली आदी जातींच्या सुमारे ४५ संघटनांनी राज्यसरकारला निवेदने दिली आहेत.

महाराष्ट्रातही जातनिहाय जनगणना करण्याबाबतची मागणी अनेक ओबीसी संघटना करीत असून गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी प्रलंबित आहे. जनगणना हा विषय केंद्र शासनाशी संबंधित आहे. मात्र, जातनिहाय जनगणना करण्यास केंद्र सरकारचे गृह राज्य मंत्री नित्यानंद रॉय यांनी लोकसभेत ओबसीची जतनिहाय जनगणना करणार नाही असे व्यक्तव्य व्यक्त केली आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने बिहार सरकारप्रमाणे जातनिहाय जनगणना करावी. तसा ठराव ९ जानेवारी २०२० साली तत्कालीन सभापती नाना पटोले यांनी जातनीहाय जनगणनेचा मांडला होता. तो सर्व भाजपा , राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस सहित सर्व पक्षांनी एकमताने विधानसभेत मंजूर केला होता. त्याचीच अंमलबजावणी शिंदे- फडणवीस सरकारने त्वरीत करावी; अन्यथा, ठाणे ओबीसी एकीकरण समितीच्या माध्यमातून राज्यभर ओबीसींमध्ये जनजागृती करुन रस्त्यावरची लढाई लढण्यात येईल, असा इशारा पत्राद्वारे दिला आहे. याप्रसंगी ओबीसी एकीकरण समितीचे निमंत्रक प्रफुल वाघोले, कुणबी संघटनेचे अशोक विशे, मराठा सेवा संघाचे मंगेश आवळे,विलास हांडे, काँग्रेसच्या ओबीसी सेलचे राहुल पिंगळे, बळीराम हांडे, शिवराम सापळे आदी उपस्थित होते.

नागरिकांचे कायदेशीर हक्क व जनजागृतीसाठी 'धर्मवीर न्यायज्योत' अभियान

ठाणे : बाळासाहेबांच्या शिवसेनेतर्फे'धर्मवीर न्यायज्योत' नागरिकांचे कायदेशीर हक्क व जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे व बाळासाहेबांच्या शिवसेनेचे महाराष्ट्र प्रदेश समन्वयक, प्रवक्ते नरेश म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येणार आले होते.

धर्मवीर न्यायज्योत या अभियानात महिला व बालकांचे हक्क व संबंधित कायद्यांचे मार्गदर्शन, ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कासंबंधित कायद्यांविषयी मार्गदर्शन, कौटुंबिक हिंसाचार व त्या संदर्भातील कायदेशीर तरतुदी, क्रिमिनल कायद्यांतर्गत तक्रारदार व पीडितांचे हक्क, शेतजमीन संदर्भातील कायदेशीर तरतुदी, सायबर गुन्हे व इतर कायद्यांविषयी सल्ला आदींबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

अनेकदा नागरिकांसाठी असलेल्या कायद्याची माहिती नसते, त्यामुळे अनेकदा विविध योजनांपासून नागरिक वंचित राहतात. यासाठी धर्मवीर न्यायज्योत या माध्यमातून नागरिकांचे कायदेशीर हक्क व जनजागृती अभियान राबविले जात आहे. या माध्यमातून कायदेतज्ज्ञ दर रविवार १२ ते दुपारी २ या वेळेत आनंद आश्रम, टेंभीनाका, ठाणे येथे नागरिकांना मोफत सल्ला व मार्गदर्शन करणार आहेत. तसेच दर शनिवारी सकाळी १० ते सायं. ५ या वेळेत दुरध्वनीवरुन कायदेतज्ज्ञ मार्गदर्शन करणार असून ९८३३६५६६८८ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी आपला हक्क व कायदा यासाठी मार्गदर्शन करुन घेण्यासाठी संपर्क साधावा असे आवाहन धर्मवीर न्यायज्योत समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

हुक्का पार्लरकडे वळण्यापेक्षा तरुणांनी गड संवर्धनाकडे वळावे

शिवनेरी-रायगड शिवरथ यात्रेच्या समारोप प्रसंगी आ. संजय केळकर यांचे आवाहन

ठाणे: हुक्का पार्लर आणि बार संस्कृतीकडे वळण्यापेक्षा तरुणांनी गड-किल्ले संवर्धनाकडे वळावे असे आवाहन करत आमदार संजय केळकर यांनी शिवनेरी-रायगड शिवरथ यात्रेत सामील झालेल्या तरुणांचे कौतुक केले.

पुण्यातील शिवनेरी ते कोकणातील रायगड किल्ला अशी शिवरथ यात्रा मंगळवारी पूर्ण झाली. सह्याद्री प्रतिष्ठानच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या यात्रेचा समारोप रायगडावर झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सह्याद्री प्रतिष्ठानचे राज्य कार्याध्यक्ष तथा आमदार संजय केळकर उपस्थित होते.

सह्याद्री प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या या यात्रेत राज्यातील अनेक शिवप्रेमी संस्था आणि संघटनांचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. रायगडावर या यात्रेचा समारोप करण्यात आला. आमदार संजय केळकर यांच्या हस्ते शिवमूर्तीचा जलाभिषेक आणि पूजन करण्यात आले. त्यानंतर शेकडो शिवप्रेमींना उद्देशून केळकर यांनी मार्गदर्शन केले. 'शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या राज्यातील शेकडो गड-किल्ल्यांचे संवर्धन करण्याची गरज आहे. आधुनिक काळात बऱ्यापैकी तरुण मंडळी शिवकालीन इतिहासापासून दूर होऊ लागली आहेत. बार आणि हुक्का पार्लर संस्कृतीपासून दूर नेण्यासाठी मी चळवळ सुरू केली आहे. या चळवळीला चांगले यश येत आहे. या तरुणांनी गड-किल्ले संवर्धनाकडे वळावे' असे आवाहन आ.केळकर यांनी केले.

सह्याद्री प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष श्रमिक गोजमगुंडे यांच्या नेतृत्वाखाली देशात प्रथमच पालखी सोहळा आयोजित करण्यात आला. या सोहळ्याला यंदा १३ वर्षे पूर्ण झाली आहेत. या समारोपास रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे आणि शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्रातील प्रमुख नद्यांचे जल व स्वराज्यातील गड किल्ल्यांवरील जलाने महाराजांच्या पादुका व उत्सवमूर्तीस महाभिषेक केला जातो. या यात्रेत विविध संघटना जोडल्या जातात.

किल्ले शिवनेरीपासून ही शिवरथयात्रा सुरु होते. कटाक्षाने शिस्त पाळली जाते. सर्व विभागाच्या परवानग्या घेतल्या जातात. या पाच दिवसांत शिवरथ यात्रा विविध गांवातून जात असताना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. जंगी ढोल-ताश्याच्या गजरात, लेझिमच्या तालात पालखीचे गावोगावी स्वागत होते.

शिवकालिन युद्ध प्रात्यक्षिके, सामाजिक प्रबोधनपर व्याख्याने आयोजित केली जातात. छत्रपती शिवरायांचा इतिहास, गड-किल्ल्यांचे महत्व सांगितले जाते. तरुणांमध्ये गडसंवर्धनाची चळवळ रुजवली जाते.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात रुग्ण आणि नातेवाईकांना होणार 'पुस्तकांची साथसंगत'

महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या संकल्पनेतून होणार वाचनालयाची उभारणी

ठाणे: एखादा व्यक्ती आजारी पडला तर रुग्णांसहीत नातेवाईकांची तारांबळ उडते. मानसिक ताणतणाव वाढतो, अशावेळी रुग्णांना धीर देण्यासाठी, मानसिक आधार देण्यासाठी रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांचे नातेवाईक यांच्या वेळेचा सदुपयोग व्हावा म्हणून आयुक्त अभिजीत बांगर यांनी नव्या मित्राची साथसंगत देण्याची योजना आखली आहे. हा मित्र म्हणजे पुस्तक असून, यापुढे कळवा येथील ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात डॉक्टर्स, नर्सेस, वॉर्डबॉय यांच्यासह रुग्ण आणि रुग्णांच्या नातेवाईकांसाठी मोफत वाचनालय सुरू करण्यात येणार आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील छत्रपती महाराज शिवाजी रुग्णालयात गोरगरीब, मध्यमवर्गीय कुटुंबातील रुग्ण हे विविध उपचारांसाठी येत असतात. या ठिकाणी दररोज ओपीडीसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या ही साधारणत: पंधराशेच्या आसपास असल्यामुळे उपचारासाठी रुग्णांना व त्यांच्यासोबत आलेल्या नातेवाईकाला नंबर येईपर्यंत तसेच उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांच्या सोबत असलेल्या व्यक्तींच्या वेळेचा सदुपयोग होण्यासाठी वाचनालयाचा निश्चितच उपयोग होणार आहे. तसेच उपचारासाठी दाखल झालेल्या रुग्णांचा बरे होवून घरी जाण्याचा कालावधी हा पाच ते सात दिवसांचा असतो, अशा रुग्णांसाठी वॉर्डमध्ये स्वतंत्र वाचनालय असेल. महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या संकल्पनेतून हे वाचनालय आकार घेत असून लवकरच रुग्णालयाच्या सेवेत हे वाचनालय दाखल होणार आहे.

नुसतेच रुग्णांसाठी नव्हेतर रुग्णालयात काम करणारे डॉक्टर्स, परिचारिका, वॉर्डबॉय, आया यांच्यासाठी देखील वेगळे वाचनालय असेल. या वाचनालयात वैद्यकीय क्षेत्रातील घडामोडी, रुग्णालय व्यवस्थापन यांच्याशी संबंधित मासिके व पुस्तके उपलब्ध असतील. एकंदर वाचनालयाच्या माध्यमातून पुस्तकांची निवड अशा पध्दतीने केली जाणार आहे, ज्यातून रुग्णांची मानसिकता सकारात्मक राहील असा प्रयत्न करण्याकडे भर असेल. ज्याचा अप्रत्यक्षपणे परिणाम त्यांच्या तब्बेतीवर सकारात्मकपणे होवू शकेल. पुस्तकांच्या निवडीमध्ये बहुभाषिक पुस्तके, सकारात्मक विचार- प्रसार करणारी पुस्तके, विनोदी पुस्तके, स्वत:ची काळजी कशी घ्यावी (सेल्फ हेल्थ) आदी माहितीपर अशी पुस्तके ठेवली जातील.

शहराची उंची ही त्या शहरातील उत्तुंग इमारतीवरुन नाहीतर त्या शहरातील ग्रंथालये, वाचनसंस्कृती यावरुन ठरत असते. आज ठाणे शहरात दीडशे वर्षाचे नगरवाचन मंदिर, शंभरी पार केलेले मराठी ग्रंथ संग्रहालय अशी वाचनालये आहे, परंतु अनेक नागरिकांना वाचनालयात जावून पुस्तक विकत घेवून वाचणे हे परवडणारे नसते. किंबहुना गोरगरीब नागरिक वाचनाची आवड असूनही याला मुरड घालावी लागते. रुग्णालयात येणारे रुग्ण हे आजारामुळे चिंतेत असतात, या रुग्णांना काही अंशी दिलासा मिळावा व त्यांचा वेळ सत्कारणी लागावा यासाठी रुग्णालयात वैचारिक कोपरा सुरू करण्यात येणार आहे. आकर्षक स्वरुपात वाचनालयाची मांडणी करणार असल्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येकाला या वाचनालयात जावून पुस्तक चाळावेसे वाटेल असा विश्वासही आयुक्त बांगर यांनी व्यक्त केला आहे. वाचनालयाचा उपक्रम हा 'लेटस् रीड इंडिया' या फाऊंडेशनच्या यांच्या मदतीने राबविला जात आहे. वाचनसंस्कृतीचा प्रसार व्हावा यासाठी लेटस् रीड फाऊंडेशनच्या माध्यमातून राज्यभरात विविध उपक्रमाचे आयोजन केले जात असून त्यांच्या सहकार्याने या वाचनालयाची उभारणी केली जाणार असल्याचे आयुक्त बांगर यांनी नमूद केले.

'पुस्तके सांगतात गोष्टी युगायुगाच्या..' 'वाचाल तर वाचाल' पण आजच्या धावपळीच्या जगात पुस्तके वाचावयास वेळ मिळत नाही. अनेकांना आर्थिक परिस्थितीअभावी पुस्तके विकत घेणे परवडत नाही. यासाठी सर्वात प्रथम छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात ही संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यात येत असून टप्याटप्याने महापालिकेच्या इतरही आरोग्यकेंद्रात वाचनालये सुरू करण्याचे प्रशासनाच्या विचाराधीन असेही महापालिका आयुक्त बांगर यांनी नमूद केले.

कोपरी रेल्वे ओलांडणी पुलाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

मुंबई आणि ठाणे जिल्ह्याच्या सीमेवर प्रवाशांची वाहतूक कोंडीतून सुटका

ठाणे : मुंबई–ठाणे जिल्ह्याच्या सीमेवर प्रवाशांची वाहतूक कोंडीपासून सुटका करण्याच्या दृष्टीने मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्यावतीने उभारण्यात आलेल्या ठाणे शहरातील कोपरी येथील रेल्वे ओलंडणी पुलाचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या पुलाच्या रुंदीकरणामुळे मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील सीमेवरील वाहतूक कोंडी दूर होऊन ती सुरळीत होणार आहे.

यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार सर्वश्री निरंजन डावखरे, प्रताप सरनाईक, संजय केळकर, माजी आमदार रविंद्र फाटक, विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवासन, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पोलीस आयुक्त जय जित सिंह आदी यावेळी उपस्थित होते.

या पुलाचे रुंदीकरण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे. कोपरी रेल्वे ओलांडणी पुलाच्या कामाचा संपूर्ण खर्च एमएमआरडीएमार्फत करण्यात आला आहे. पुलाच्या रेल्वे मार्गिकांवरील भागाचे काम मध्य रेल्वे मार्फत करण्यात आले असून या भागाच्या बांधकामासाठी प्राधिकरणकडून रेल्वेला निधी देण्यात आला आहे. या पुलाची लांबी ७८४ मीटर तर रुंदी ३७.०४ मीटर इतकी आहे.

पूर्व द्रुतगती महामार्गावर हा पूल ५+५ मार्गिकांचा आहे तर ठाणे शहरातील कोपरी रेल्वे ओलांडणी पूल हा २+२ मार्गिकांचा होता. या अरुंद रेल्वे ओलांडणी पुलामुळे सकाळी व संध्याकाळच्या वेळेत या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत होती. या वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्याच्या उद्देशाने प्राधिकरणामार्फत कोपरी रेल्वे ओलांडणी पुलाचे रुंदीकरण व बांधकाम करण्यात आले आहे. २+२ पथमर्गिकेच्या पुलाचे ४+४ असे अपग्रेड केल्यामुळे मुंबई–ठाणे जिल्ह्याच्या सीमेवरील वाहतूक कोंडी कमी होऊन त्याचा फायदा पूर्व द्रुतगती महामार्गावरील लहान तसेच अवजड वाहनांना होणार आहे.

या प्रकल्पात नौपाडा जंक्शन ते ज्ञानसाधना कॉलेजपर्यंत महामार्गाखालून वाहानांच्या रहदारीसाठी २+२ मार्गिकांचा ४० मीटर लांब आणि २१.२ मीटर रुंद भुयारी मार्ग देखील बांधण्यात आला आहे. प्रस्तावित नवीन कोपरी स्टेशनला जाणाऱ्या वाहनांसाठी भुयारीमार्ग, पादचाऱ्यांना पूर्व द्रुतगती महामार्ग ओलांडण्यासाठी पादचारी पूल देखील बांधण्यात आला आहे. तसेच चिखलवाडी परिसरातील पावसाळी पाण्याचा निचरा होण्याकरीता, चिखलवाडी नाल्यापासून साठेवाडी नाल्यापर्यंत पर्जन्य जल वहिनीची (स्ट्रॉम वॉटर ड्रेनची) सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या बंदिस्त नाल्याचे सुधारीकारण देखील करण्यात आले आहे.

श्रीनिवासन म्हणाले की, कोपरी पूल हा मुंबई आणि ठाणे या दोन्ही जिल्ह्यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. जुना पूल हा अरुंद असल्यामुळे अधिक गर्दीच्यावेळी (पीक अवर्स) मध्ये वाहनचालकांना काही मीटरचा प्रवास करण्यासाठी ३०ते ४० मिनिटे लागत. पूर्व द्रुतगती महामार्गावरील दोन्ही बाजूने येणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात कोंडी होत होती. नवीन रुंद पुलामुळे प्रवाशांचा हा वेळ वाचणार आहे. त्यासोबतच तीन हात नाका परिसरातील वाहतुकीत मोठ्या प्रमाणात घट होणार आहे.

‘वंदे भारत एक्सप्रेस’चे ठाण्यात भाजपाकडून स्वागत

रेल्वे स्थानकात भाजपा कार्यकर्ते व प्रवाशांकडून जल्लोष

ठाणे : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून साईनगर शिर्डीकडे जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसचे ठाणे रेल्वे स्थानकात भाजपाचे कार्यकर्ते व प्रवाशांकडून जोरदार स्वागत करण्यात आले. वंदे मातरम् व मोदी... मोदी... अशा घोषणा देत भाजपा कार्यकर्ते व प्रवाशांनी जल्लोष केला. या वेळी भाजपाचे आमदार व जिल्हाध्यक्ष निरंजन डावखरे, आमदार संजय केळकर उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतात रेल्वेचा कायापालट होत आहे. वंदे भारत एक्सप्रेसच्या माध्यमातून वेगवान प्रवासाची संधी भारतवासियांना मिळत आहे. पश्चिम रेल्वेवरील मुंबई–अहमदाबाद गाडीपाठोपाठ मध्य रेल्वे मार्गावरही आजपासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते सोलापूर आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते साईनगर शिर्डीपर्यंत दोन वंदे भारत एक्सप्रेस सुरू झाल्या. या गाड्यांमधील साईनगर शिर्डी एक्सप्रेसला ठाणे रेल्वे स्थानकात थांबा देण्यात आला आहे. तर सोलापूर एक्सप्रेसला कल्याण स्थानकात थांबा दिला गेला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकातून हिरवा झेंडा दाखविल्यानंतर ठाणेमार्गे शिर्डीकडे रवाना होणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसचे ठाणे रेल्वे स्थानकात भाजपा कार्यकर्ते व प्रवाशांनी उत्स्फूर्त स्वागत केले. या स्वागतावेळी आमदार निरंजन डावखरे, आमदार संजय केळकर यांनी लोको पायलटचा सत्कार करण्यात आला. तसेच

मध्य रेल्वे मार्गावर वंदे भारत एक्सप्रेस सुरू केल्याबद्दल त्या दोघांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींबरोबरच रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचेही आभार मानले.

ठाण्यातील पत्रकारांनी काळ्याफिती लावून केले आंदोलन

ठाणे : राजापूर तालुक्यातील पत्रकार शशिकांत वारीसे यांचा अपघातात मृत्यु झाला. तर हा अपघात नसून घातपात असल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी करून गुन्हेगारांना त्वरित अटक करण्यात यावी. आणि या प्रकरणाची फास्टट्रॅक (जलदगती न्यायालयामार्फत) कोर्टामार्फत सुनावणी व्हावी या मागणीसाठी शुक्रवारी ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाच्या वतीने काळ्याफिती लावून ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेर आंदोलन केले. तसेच पत्रकारांच्या शिष्टमंडळाने ठाणे जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत निवेदन दिले. यावेळी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पितळे यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.